Research Dimension

ISSN: 2249-3867

Impact Factor: 5.1899(UIF)


The Shendurni Secondary Education Co-op. Society's
Appasaheb R. B. Garud Arts, Commerce and Science College, SHENDURNI, Tal. Jamner, Dist. Jalgaon, Maharashtra, India

Sponsored by
North Maharashtra University, Jalgaon

## NATIONAL MULTI DISCIPLINARY CONFERENCE

# on "DIGITAL PAYMENT SYSTEM AND RURAL INDIA"

7th October, 2017




Scanned with CamScanner

ISSN: 2249-3867 IMPACT FACTOR : 5.1899(UIF)

RESEARCH DIMENSIONS

# ग्रामीण भागातील ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर रोकडविरहित व्यवहारांचा झालेला परिणाम- एक अभ्यास



प्रा.योगिता पांडुरंग चौधरी

**सारांश :**

आर्थिक व्यवहार करतांना प्रत्यक्ष चलन न हाताळता पूर्ण केलेला कोणताही आर्थिक व्यवहार म्हणजे कॅशलेस/ रोकडविरहित व्यवहार म्हणता येईल.चलनबदलानंतर देश कॅशलेस होण्याकडे वाटचाल करताना दिसतो आहे. उत्पादक,व्यापारी,वितरण साखळी, ग्राहक या आणि अनेक घटकांवर रोकडविरहित व्यवहारांचा परिणाम झालेला दिसून येतो. या सर्वच घटकांमधील एक महत्वाचा घटक म्हणजे ग्राहक होय. ग्राहक रोकडविरहित व्यवहार करण्याची प्रक्रिया आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहे.त्याचवेळी या प्रक्रियेमध्ये कमालीचा गोंधळ निर्माण झाला असून ही चिंतेची बाब आहेरोकडविरहित व्यवहारांची सोय होण्याऐवजी त्यामुळे ताण वाढतो आहे की यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावे लागत . आहे? असे प्रश्न सध्या निर्माण होत आहेत .असाच ग्रामीण भागातील ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर रोकडविरहित व्यवहारांचा झालेला परिणाम जाणून घेण्यासाठी सदर संशोधन करण्यात आले आहे.

**कि वर्डस :** ग्राहक, खरेदी क्षमता, रोकडविरहित व्यवहार .

**प्रस्तावना :**

पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदींनी नोटाबंदीचा अचानक घेतलेल्या निर्णयामुळे देशातील जनतेला आश्चर्यात टाकले होते नोटाबंदीनंतर सरकार रोज नवनवीन निर्णय अमलात आणत .होते. नोटबंदीकरण्याचा महत्वाचा उद्देश रोकडविरहित व्यवहाररांमध्ये वृद्धी करणे असे सांगण्यात आले. त्याशिवाय ८ डिसेंबरला 2016 ला अर्थमंत्री अरूण जेटली यांनी कॅशलेस ट्राजेक्शनला चालना देण्यासाठी अनेक सवलती जाहीर केल्यापरंतु . कॅशलेस अर्थव्यवस्था देशासाठी खरोखरच फायद्याची आहे की नाही? ग्राहकांना या रोकडविरहित व्यवहार प्रणालीचा काय फायदा झला? त्यांना अडचणी काय आल्या? हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन कार्य करण्यांत आलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ठये :**

१. रोकडविरहित प्रणालीचा ग्रामीण भागातील ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर झालेला परिणाम जाणून घेणे.
२. रोकडविरहित प्रणालीचा ग्राहकांच्या मानसिकतेवर झालेला परिणाम जाणून घेणे.
३. रोकडविरहित प्रणालीचा वापर करताना ग्राहकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
४. रोकडविरहित प्रणालीचा वापर करतांना ग्राहकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजनांच्या माध्यमातून प्रयत्न करणे.



Scanned with CamScanner

**संशोधनाची गृहीतके :**

१. ग्रामीण भागातील सर्वच ग्राहकांनी रोकडविरहित व्यवहार प्रणालीचा स्वीकार/ वापर केलेला नाही.
२. रोकडविरहित व्यवहार प्रणालीचा वापर करताना आवश्यक तंत्रज्ञानाच्या हाताळणी बाबतच्या ज्ञानाचा अभाव ग्रामीण भागातील ग्राहकांमध्ये जाणवितो.

**संशोधनाची व्याप्ती :**

संशोधनाची भौगोलिक व्याप्ती जळगाव जिल्हयातील जामनेर तालुका निर्धारित करण्यांत आली असून जामनेर तालुक्यातील २० खेड्यांमधील १०० ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर रोकडविरहित व्यवहार प्रणालीचा झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्यांत आलेला आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन विश्लेषनात्मक पद्धतीतून करण्यांत आलेले असून पुढील प्रमाणे माहितीचे संकलन करण्यांत आलेले आहे.

**प्राथमिक माहिती :** प्रश्नावली,प्रत्यक्ष मुलाखती, वैयाक्तिक अनुभव
**दुय्यम माहिती :** निरनिराळी पुस्तके, मासिके, वर्तमान पत्रातील लेख,शासनाचे अहवाल इ.

**न्यादर्श :**

जामनेर तालुक्यातील सर्वच ग्राहकांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने तालुक्यातील २० खेड्यातील १०० ग्राहकांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यांत आलेली आहे.

**माहितीचे विश्लेषण :**


देशात सध्या कॅशलेस अर्थात रोकडरहित व्यवहारांच्या दिशेने जाण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कॅशलेस इकॉनॉमीचा नारा स्वागतार्ह असला, तरी वास्तवतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आज शहरांत कॉलनी-कॉलनीत बँका आणि एटीएम सेंटर असली, तरी ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्था आजही पुरेशा प्रमाणात पोचलेली नाही. दुसरीकडे, खातेदारांच्या प्रमाणात बँकांत कर्मचारी नसल्याने किरकोळ कामासाठीही शेतकऱ्याला बँकांत अनेक खेटे घालावे लागतात. कॅशलेसकडे जाण्यापूर्वी ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्थेचे जाळे विस्तारणे आणि बँकिंग व्यवस्था सक्षम करणे आवश्यक आहे.

नोटाबंदीच्या निर्णयानंतर अर्थक्षेत्रातील अनेक उणिवा समोर आल्या आहेत. विशेषतः ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्था किती तकलादू आहे, याचा प्रत्यय येत आहे. शहरात एटीएम आणि बँकांचे प्रमाण भरमसाठ असताना खेड्यात मात्र त्याचे प्रमाण नगण्य दिसून येत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरच शहरी अर्थव्यवस्था अवलंबून असल्याचे सांगितले जात असले, तरी ग्रामीण भागातील सक्षमीकरणाकडे आजवर नेहमीच दुर्लक्ष झाले आहे. या सक्षमीकरणासाठी केवळ बँका किंवा एटीएम सुरू करून चालणार नाही, तर खातेदारांना चांगली सुविधा देणेही महत्त्वाचे आहे. खाते उघडण्यापासून कर्जवाटपापर्यंतच्या प्रक्रियेतून जाताना ग्राहकांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. खेड्यात तर बँक खाते उघडण्यासाठी दहा खेटे मारावे लागतात. परिणामी गावकरी खाते उघडण्यापासून परावृत्त होतो. अशा प्रकारची अनेक आव्हाने ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर आहेत. अशाच ग्रामीण अर्थव्यवस्थेतील ग्राहकांना प्रश्नावलीच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष भेटीच्या माध्यमातून काही प्रश्न विचारण्यात आले . त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.



Scanned with CamScanner

आलेख क्र. ०१




ग्रामीण भागातील ग्राहकांना विचारलेल्या निरनिराळ्या प्रश्नांची अशी विविध उत्तरे प्राप्त झालीत. त्यात रोकड विरहित व्यवहार प्रणालीची माहिती असणारे ९५ ग्राहक तर या प्रणालीचा कधी नं कधी तरी वापर करणारे ५३ ग्राहक आढळून आले. रोकड विरहित व्यवहार प्रणालीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध आहेत असे फक्त २४ ग्राहकांना वाटते. तसेच रोकड विरहित व्यवहार प्रणाली फायदेशीर आहे असे ४५ ग्राहकांना तर ५२ ग्राहकांना ती प्रणाली घातक वाटते. भविष्यात रोकड विरहित व्यवहार प्रणाली यशस्वी होईल असे फक्त १७ ग्राहकांना वटते.

नोटाबंदीच्या निर्णयानंतर कॅशलेस आणि डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने विविध लकी ड्रॉ योजना जाहीर केल्या होत्या. या लकी ड्रॉ आणि डिजिधन व्यापार योजनेंतर्गत ७ फेब्रुवारीपर्यंत सुमारे ७ लाख ६० हजार उपभोक्ता आणि दुकानदारांना सुमारे ११७ कोटी ४० लाख रुपयांचे बक्षिस वितरण करण्यात आले आहे; अशी माहिती नीति आयोगाकडूनदेण्यात आली होती नीति आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, या योजनांमध्ये महिला आणि पुरूषांनी सक्रीय सहभाग नोंदविला होता . ताजा आकडेवारीनुसार महाराष्ट्र, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक या पाच राज्यांमधील विजेत्यांची संख्या इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. कॅशलेस व्यवहार करणाऱ्या विजेत्यांमध्ये १२ ते ३० वर्षे वयोगटात असणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. मात्र संशोधन क्षेत्रातून एकही व्यक्तीला याचा लाभ मिळालेला नाही.

## समस्या :

निश्चलनीकरणाच्या निर्णयानंतर कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या चर्चेने जोर पकडला. पण आपल्या देशात कॅशलेस अर्थव्यवस्थेसाठी मूलभूत सुविधांचाच वानवा आहे आणि लोकसंख्येच्या निम्म्याहून जास्त नागरिक बँकिंग व्यवहारापासून लांब आहेत. अशा वेळेस आपण कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या परिघाबाहेरच राहणार आहोत.प्रमुख समस्या पुढील प्रमाणे

१. ग्रामीण भागातील ग्राहकांना रोकड विरहित व्यवहार प्रणालीची पुरेशी माहिती नसल्याने आजही ते रोकड विरहित व्यवहार करण्यांस त्यांच्या मनात भीती आहे.
२. ग्रामीण भागातील ग्राहकांना रोकड विरहित व्यवहार प्रणाली चा वापर करण्यासाठी सुविधांचे पुरेसे ज्ञान नाही. उदा. इंटरनेट, अन्ड्रोइद मोबाइल फोन, ओतीपी, बँकिंग अप इ.
३. सुरक्षिततेच्या अभावाची भावना ग्रामीण भागातील ग्राहकांच्या मनात आहे. उदा. online data चोरी, pasword hacking इ.
४. ग्रामीण भागातील ग्राहकांच्या मनातील संभ्रम दूर करणेसाठी बँकिंग क्षेत्र पुरेसे प्रयत्न करतांना दिसत नाही.

## उपाययोजना :



Scanned with CamScanner

रोकड व्यवहारावर सरकारने जरी अप्रत्यक्षपणे इन्फोटेक्नॉलॉजीतून तसेच बँक बाहेर रांग आवश्यकची गरज नाही. असे केवळ व्यवहार पूर्ण होताना, पैसा खिशात ठेवून जाण्याची गरज नसल्याने सुरक्षितता प्राप्त होते. काळ्या पैशांच्या व्यवहारांवर आळा घालण्यासाठी एक प्रयत्न आहे. असा एक आणि अनेक कारणांमुळे रोकड विरहित व्यवहार प्रणाली ग्रामीण स्तरावर रुजली पाहिजे. त्यासाठी पुढील उपाययोजना सांगता येतील.

१ ग्रामीण भागातील ग्राहकांना रोकड विरहित व्यवहार प्रणाली चा स्वीकार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

२ ग्रामीण भागातील ग्राहकांनी रोख खरेदीची त्यांची मानसिकता बदलून रोकड विरहित व्यवहार प्रणालीचा स्वीकार मनापासून करावा.

३ बँकांनी सुद्धा पुढाकार घेऊन जास्तीत जास्त ग्राहकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

४ सायबर गुन्ह्यात संरक्षणे लक्ष घालून ग्राहकांना सुरक्षितता प्रदान केली पाहिजे.

## निष्कर्ष :

ग्रामीण भागातील ग्राहकांच्या रोकड विरहित व्यवहार प्रणालीचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते कि, आजहि शासनाचे धोरण डिजिटल इंडियाचे असले तरी ग्रामीण भागात हि संकल्पना रुजण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करावे लागणार आहेत. निरनिराळ्या कारणांमुळे ग्रामीण भागातील ग्राहक आजही रोकड विरहित व्यवहार प्रणाली स्वीकारण्यास पूर्णतः तयार नाहीत. कोणत्याही वस्तूची खरेदी करण्यासाठी ग्रामीण भागातील ग्राहक रोख प्रणालीचाच वापर जास्त प्रमाणात करताना दिसतात.म्हणूनच ग्रामीण भागातील ग्राहकांनी रोकड विरहित व्यवहार प्रणालीचा स्वीकार करण्यासाठी स्वतः पुढाकार घेण्याची तसेच शासनस्तरावर पुरेपूर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## संदर्भ :


1. कॅशलेस व्यवहार : साडेसात लाख नागरिकांना ११७ कोटींचे बक्षिस February 9, 2017, 2:38 pm by माझा पेपर
2. कॅशलेस व्यवहार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था,शैलेश धारकर,शनिवार, 31 डिसेंबर 2016
3. CSC_Monthly_Magazine_Tarang_January_2017_English.pdf
4. बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसरराज्याच्या सर्व भागात बँकिंग नेटवर्क चा वस्तार आथिर्य-द. 14 सप्टेंबर, 2017
5. Journey Towards Cashless India,Jayant Parikshit
6. Indian Policy and Development,by Saumitra Mohan




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 17 | कॅशलेस(रोकडविरहीत) अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्र<br>प्रा.वसंत नानाराव पतंगे , प्रा. डॉ. शिवाजी पाते | 78 |
| 18 | नोटाबंदी आणि अंकात्मक देयक प्रणाली<br>**Prof. Vinayak Ramchandra Wasaikar** | 83 |
| 19 | रोकड विरहीत व्यवहार व कृषी अर्थव्यवस्था<br>*डॉ. संजय पी. पाटील , प्रा. योगेश झुलाल गामरे* | 87 |
| 20 | डिजीटल पेमेंट पध्दती : सर्वसामान्य दृष्टीकोन<br>***प्रा.सुरेश दगडु पाटील*** | 90 |
| 21 | डिजिटल पेमेंट सिस्टीम : यश-अपयश व भारतीय जनता आणि राजकीय विश्लेषण<br>प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे | 96 |
| 22 | डिजिटल पेमेंट : वास्तविकता आणि आव्हाणे<br>डॉ. प्रदीप औजेकर | 99 |
| 23 | डिजिटल इंडिया?<br>प्रा. सतीश दत्तात्रय पाटील | 102 |
| 24 | ग्रामीण भागातील ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर रोकडविरहित व्यवहारांचा झालेला परिणाम- एक अभ्यास<br>प्रा.योगिता पांडुरंग चौधरी | 104 |
| 25 | नकदी रहित आहरण<br>*प्रा. डॉ. गजानन वानखेडे , प्रा. कोमलकुमार परदेशी* | 108 |


Scanned with CamScanner